" विद्यामर्थंच साधयेत "

Est- 1957

Phaltan Education Society's

MUDHOJI COLLEGE PHALTAN

# फलटण एज्युकेशन सोसायटी

# मुधोजी महाविद्यालय, फलटण

## शिष्यवृत्तीधारकांसाठी माहिती

1. महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर शासनाच्या कोणत्याही एकाच शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.
2. महाविद्यालयात पुढील शासकीय शिष्यवृत्ती उपलब्ध आहेत.

अ) इ.बी.सी.

ब) शासकीय खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती

क) राष्ट्रीय शिष्यवृत्ती

ड) अनुसुचित जाती-जमातीचे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती

इ) अपंगासाठी शिष्यवृत्ती

ई) इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व फी सवलत योजना.तसेच SC, ST, NT, OBC & SBC या प्रवर्गातील सर्व मागास वर्गीय विद्यार्थ्यांना ठराविक उत्पन्नाच्या अटीवर शिष्यवृत्ती मिळेल.

उ) खुल्या वर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळेल. (उत्पादन मर्यादा रु.८००,०००)

3. शिष्यवृत्तीधारकांनां वर्गातील नियमित उपस्थिती आवश्यक आहे.
4. शिष्यवृत्तीमध्ये खंड पडला असल्यास त्या खंड कालावधीचे अधिकृत प्रमाणपत्र जोडावे..
5. वडील हयात असल्यास शिष्यवृत्ती अर्जावर इतरांची सही ग्राह्य धरली जाणार नाही.

## शिष्यवृत्तीसाठी खालील पात्रता आवश्यक :

01. विद्यार्थ्यांची जात शासनाने मान्य केलेल्या मागासवर्गीय, अनुसूचित जाती व जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती जातीमध्ये समाविष्ट असावयास हवी. पूर्वाश्रमीच्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी बौद्ध धर्म स्वीकारला असेल तर त्यांना व इतर मागास व विशेष मागास प्रवर्ग शिष्यवृत्तीस पात्र समजण्यात येते.

02.अ) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये १,००,०००/- (एक लाख) आहे. अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळते.

ब) शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचे राष्ट्रीयकृत बँकेत स्वतःचे बचत खाते असावे.

उदा. - १) भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा फलटण

२) बँक ऑफ इंडिया, शाखा फलटण

03. विद्यार्थ्याचे वडील खाजगी व्यवसाय अथवा नोकरी करीत असल्यास त्यांच्या वार्षिक उत्पन्नाचा दाखला (पगार, महागाई भत्ता इ. सह) संबंधित अधिकृत व्यक्तीच्या सहीनिशी अर्जासोबत जोडला पाहिजे,

04.विद्यार्थ्याने अर्जामध्ये नमूद केलेली जात आणि त्याला संबंधित माध्यमिक शाळेकडून मिळालेल्या दाखल्यातील जात एकच असावी.

05.विद्यार्थी जर मान्यताप्राप्त वसतिगृहात राहात असेल तर त्याने त्या वसतिगृहाचे नाव, निवास व जेवणासाठी होणारा मासिक खर्च आणि आपली प्रवेश तारीख यासंबंधी माहिती खुलासेवार आणि बिनचूक द्यावी आणि तत्संबंधी वसतिगृह प्रमुखाचा दाखला आपल्या आवेदनपत्राला जोडावा.

06.आवेदन पत्रासोबत पास झालेल्या परीक्षेची गुणपत्रिका जोडावी.

07. जातीसंबंधीचे प्रमाणपत्र खालील अधिकाऱ्यांचेकडून साक्षांकित करावे. संसद सदस्य, राज्य / संघराज्य / क्षेत्र मंडळाचे सदस्य, नगरपालिका किंवा जिल्हा परिषद राजपत्रित अधिकारी किंवा अर्जदार प्रत्यक्ष जेथे राहात असेल त्या राज्य शासनाने, संघराज्य क्षेत्र शासनाने विशेषरित्या प्राधिकृत केलेला अधिकारी यांची सही असली पाहिजे.

08.जो विद्यार्थी पूर्णवेळ नोकरी करीत असेल तो बी.सी. शिष्यवृत्तीस पात्र ठरणार नाही.

टीप:- शिष्यवृत्ती बद्दल अधिक माहितीसाठी शिष्यवृत्ती विभाग मुधोजी महाविद्यालय, फलटण यांच्याशी संपर्क साधावा

MUDHOJI COLLEGE • PHALTAN DIST. SATARA

Principal
Mudhoji College,Phaltan
Satara Pin Code- 415523